सकाळ

# ‘देवचंद’ला क्रिएटिव्ह परफॉर्मन्स पुरस्कार

**सकाळ वृत्तसेवा**

नानीबाई चिखली, ता. १२ : क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्यामार्फत देण्यात येणारा ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा’ २०२४ चा क्रिएटिव्ह परफॉर्मन्स पुरस्कार अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयाला प्रदान करण्यात आला. तसेच समृद्धी भराडे, शीतल शिरगावे या विद्यार्थिनींना बेस्ट प्रोसेस कंप्लायन्स पुरस्कार, तर प्रा. प्रशांत कुंभार यांना एक्स्ट्रा माईल रिकग्नेशन पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने सायबर सुरक्षा जागरूकता महिन्याचे औचित्य साधून ‘सायबर सुरक्षा व जागरूकता’ या विषयावर ‘कमवा आणि शिका’ योजनेअंतर्गत प्रशिक्षण दिले होते. प्रशिक्षणात ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. प्रशिक्षणाच्या माध्यमातून अर्जुननगर परिसरातील १० हजार विद्यार्थ्यांचे देवचंदच्या सायबर वॉरियरकडून सायबर जागरूकतेतून प्रबोधन केले होते. याची दखल घेऊन क्विक हिल फाउंडेशनने कॉलेजमधील १० विद्यार्थी, एक शिक्षक आणि देवचंद कॉलेजला नॉमिनेशन मिळाले होते. या नॉमिनेशनमधूनच या सर्वांची निवड करण्यात आली. पुरस्कार स्वीकारताना प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे, प्रा. प्रशांत कुंभार, क्विक हिल फाउंडेशनच्या सीईओ अनुपमा काटकर व इतर मान्यवर उपस्थित होते.




अर्जुननगर : क्विक हिल फाउंडेशन, पुणे यांच्यामार्फत देण्यात येणारा ‘सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा२०२४’ चा पुरस्कार स्वीकारताना देवचंदच्या प्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे. यावेळी प्रा. प्रशांत कुंभार, अनुपमा काटकर.